नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ४७ Issue - 47 | वार - शनिवार दि. ११ जुलै २०२६ Blow- Saturday Date 11 JULLY 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यातील बळीराजाला आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी

## राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील बळीराजाला आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'ची व्याप्ती वाढवत, २०१९ मधील 'महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजने'च्या सुमारे २ लाख लाभधारक शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. याशिवाय योजनेतील २६-२७ चा नियमही वगळण्यात येणार असल्याने राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावरील विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकरी हिताला प्राधान्य देत असल्याचे अधोरेखित केले, तर दुसरीकडे पायाभूत सुविधांच्या कामांवरून खोट्या बातम्या पसरवून 'मिसिंग लिंक'च्या पुलाबाबत चिखलफेक करणाऱ्या विरोधकांना 'सुपारीबाज' आणि 'भाटक गदर्भ' (भाडोत्री गाढव) म्हणत प्रतिटोला लगावला.

### अजित पवारांच्या अपघाताचे सत्य बाहेर आणणारच

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या चौकशीबाबत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, सीआयडी आणि 'एएआयबी' यंत्रणांकडून दोन प्रकारे तपास सुरू आहे. 'एएआयबी'चा अंतिम अहवाल साधारणतः जानेवारी २०२७ पूर्वी येईल. केंद्र सरकारच्या विनंतीनुसार यात परदेशी तज्ज्ञांची मदत घेतली जात असून, ब्लॅक बॉक्समधील संपूर्ण डेटा डाऊनलोड झाला आहे. पायलट सुमीत कपूर यांच्या बँक खात्यांची, शेअर्सची तपासणी केली असता काहीही संशयास्पद आढळलेले नाही. दादांच्या पुण्यतिथीपूर्वी हा अहवाल येईल आणि त्यातील सत्य बाहेर आल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.**

विधानसभेत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'वर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचे सर्व आरोप आकडेवारीनिशी खोडून काढले. ते म्हणाले, या योजनेतून केवळ १२ हजार कोटींचाच लाभ मिळेल आणि ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल, हा विरोधकांचा दावा पूर्णपणे खोटा आहे. ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे कवच देणारी आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी आहे. मविआच्या काळात महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजनेत २ लाखांपेक्षा एक रुपया जरी जास्त थकबाकी असली तरी शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही. मात्र, आमच्या सरकारने २ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेत सामावून घेऊन २ लाखांपर्यंतची कर्जमाफी दिली आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत, महात्मा फुले कर्जमाफी योजनेतील लाभधारकांना आधी ५० हजारांचा लाभ देण्याचे निश्चित झाले होते. मात्र, आमदार रणधीर सावरकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन जनभावना मांडली. त्या पार्श्वभूमीवर, जनभावनेचा आदर करत २०१९ मधील या २ लाख शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचा मोठा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. यासोबतच दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांची वीज बिल माफी देखील महायुती सरकार शेतकऱ्यांना देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



'मिसिंग लिंक' प्रकल्पाच्या पुलाला एकही तडा (क्रॅक) गेला नसताना ७ हजार कोटी पाण्यात गेल्याच्या खोट्या बातम्या पेरून महाराष्ट्राचा अपमान केला जात असल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मी परवा हिंदीत 'भाडे के टट्टू' हा शब्द प्रयोग केला, तो ज्यांना समजायला हवा होता त्यांना बरोबर समजला. पण काहींना उगाच मिरची लागली. ठीक आहे, मी तो शब्द मागे घेतो आणि त्याऐवजी 'भाटक गदर्भ' हा शब्द वापरतो. कोणाला तरीही समजले नसेल, तर सरळ 'सुपारीबाज' म्हणतो, अशा शब्दांत त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे नाव न घेता, ते राजकारणात आहेत याचा आनंद आहे, ते जर मिमिक्री क्षेत्रात गेले असते तर एकाही स्टँडअप कॉमेडियनला मार्केट राहिले नसते, असा टोलाही त्यांनी लगावला.

सभागृहात कायदा व सुव्यवस्थेवर बोलताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्रति एक लाख लोकसंख्येच्या आधारावर क्राईम रेट मोजला जातो. या निकषानुसार गुन्हेगारीच्या दरात महाराष्ट्र देशात ७ व्या, महिलांवरील अत्याचारात ९ व्या आणि बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये देशात १७ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे महाराष्ट्र सुरक्षित राज्य आहे. राज्यातील 'अपराध सिद्धीचा दर' २००८ मधील ९.४ टक्क्यांवरून ५२.६ टक्क्यांवर पोहोचला असून नवीन कायद्यांमुळे तो ८० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. बेपत्ता महिलांपैकी ९३ टक्के (२ लाख १७ हजार ७५८) महिलांचा शोध घेऊन त्यांना घरी सुखरूप पोहोचवले असून, यात ४६ टक्के केसेस या प्रेमप्रकरणाच्या तर २० टक्के कौटुंबिक वादाच्या असल्याचे विश्लेषणातून समोर आल्याचे ते म्हणाले.

**पोलीस दल बळकट होणार**

पोलीस दलाच्या आधुनीकीकरणासाठी केंद्राने ७३३ कोटींचा (६० टक्के केंद्र आणि ४० टक्के राज्य) निधी मंजूर केला असून आगामी ६ महिन्यांत सागरी सुरक्षा, ड्रग्ज तस्करी रोखणे आणि सायबर गुन्हेगारीविरोधात अत्याधुनिक शस्त्रे, ड्रोन, स्पीड बोट व हावरक्राफ्ट खरेदी केले जातील. पोलिसांच्या घरांसाठी १ हजार ७०० कोटींची 'डीजी लोन' सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. आमदार कालिदास कोळंबकर यांनी उपस्थित केलेल्या पोलिसांच्या मालकी घरांच्या प्रश्नावर, पुढील ७ दिवसांत उच्चस्तरीय समिती नेमली जाईल आणि ३ महिन्यांत यावर अंतिम अहवाल मागवून योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

**स्मार्ट मीटरच्या तक्रारींमध्ये तथ्य नाही**

राज्यात महावितरणच्या माध्यमातून लावण्यात आलेल्या १ कोटी २३ लाख 'स्मार्ट मीटर'च्या मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाची आकडेवारी दिली. एकूण १ कोटी ग्राहकांपैकी ३ लाख ९२ हजार ग्राहकांकडून तक्रारी आल्या होत्या. त्याची खातरजमा करण्यासाठी महावितरणने तपासणी केली असता, केवळ २१० तक्रारींमध्येच तथ्य आढळल्याचे स्पष्ट करत त्यांनी विरोधकांचा दावा खोडून काढला.

# सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांवर आक्षेपार्ह टिप्पणी, न्यायमूर्तींसमोर गोंधळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान एका वकिलाने न्यायालयीन शिष्टाचाराचे उल्लंघन करत न्यायमूर्तींसमोर अभूतपूर्व गोंधळ घातल्याची घटना घडली. सुनावणी सुरू असताना संबंधित वकिलाने न्यायमूर्तींनाच आदेश देण्याचा प्रयत्न केला, न्यायमूर्तींच्या दिशेने कागदपत्रे भिरकावली आणि सरन्यायाधीशांचा उल्लेख करत आक्षेपार्ह भाषा वापरल्याने न्यायालयात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रबल प्रताप नावाचा वकील स्वतःच्याच याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडत होता. ही याचिका इलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका निर्णयाविरोधात दाखल करण्यात आली होती. सुनावणी सुरू होताच संबंधित वकिलाने युक्तिवाद करण्याऐवजी थेट न्यायालयालाच आदेश देण्याची भूमिका घेतली. 'एसीपी, लखनऊ यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याचे आदेश द्या,' असे म्हणत त्याने न्यायालयाशी असामान्य पद्धतीने संवाद साधण्याचा प्रयत्न केला.

या वक्तव्यानंतर खंडपीठावरील न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी, 'तुम्ही आम्हालाच आदेश देत आहात का?' असा प्रश्न दोन वेळा उपस्थित केला. मात्र, त्यानंतरही संबंधित वकिलाने आपली भूमिका न बदलता, 'माझ्याकडून एवढेच, सर्व काही रेकॉर्डवर आहे,' असे म्हणत हातातील कागदपत्रे न्यायमूर्तींच्या दिशेने भिरकावली. त्यानंतर त्याने सरन्यायाधीशांचा उल्लेख करत आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचे सांगण्यात आले.

घटनेमुळे न्यायालयात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी संताप व्यक्त करत संबंधित वकिलाला तत्काळ न्यायालयाबाहेर काढण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे, या सुनावणीचे थेट प्रक्षेपण सुरू असल्याने संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

दरम्यान, न्यायालयाने संबंधित वकिलाविरोधात अवमानाची किंवा अन्य दंडात्मक कारवाई न करण्याचा निर्णय घेतला. न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांनी निरीक्षण नोंदवताना, संबंधित वकील मानसिकदृष्ट्या त्रस्त आणि हतबल असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याच्याविषयी सहानुभूती बाळगत न्यायालय त्याच्याविरोधात कठोर कारवाई करणार नसल्याचे स्पष्ट केले. मात्र, त्याची याचिका फेटाळून लावण्यात आली. सर्वोच्च न्यायालयासारख्या सर्वोच्च न्यायिक संस्थेत घडलेल्या या अभूतपूर्व घटनेची कायदेवर्तुळात आणि न्यायालयीन क्षेत्रात मोठी चर्चा सुरू असून, न्यायालयीन शिस्त आणि वकिलांच्या आचारसंहितेबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### ३० रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्याने निर्णय

# मुंबई-पुणे रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा; आजपासून धावणार २०० अतिरिक्त बसफेऱ्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई-पुणे मार्गावर नियमित प्रवास करणाऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. या मार्गावरील सुमारे ३० रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तातडीने पावले उचलली आहेत. उद्यापासून (११ जुलै) मुंबई-पुणे मार्गावर दररोज २०० अतिरिक्त बसफेऱ्या चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

रेल्वे सेवा विस्कळीत झाल्यामुळे रस्त्यांवरील प्रवाशांचा भार वाढणार आहे. हीच बाब लक्षात घेऊन एसटी महामंडळाने कंबर कसली आहे. नव्या नियोजनानुसार या मार्गावर धावणाऱ्या ई-शिवनेरी बसेसच्या अधिकृत ३१२ फेऱ्या पूर्ववत सुरू राहतील. या नियमित फेऱ्यांशिवाय, प्रवाशांच्या सोयीसाठी २०० अतिरिक्त साध्या बसेसच्या फेऱ्या विशेष स्वरूपात सोडल्या जातील. यामुळे मुंबई-पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना सुरक्षित, जलद आणि अखंडित प्रवासाचा (पान २ वर...)



# वारीतील हरवलेला सेवाभावी वारकरी 'दादा'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आषाढी वारी ही केवळ पंढरपूरकडे निघालेली पायी यात्रा नाही,तर ती महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे जिवंत प्रतीक आहे.लाखो वारकरी विठ्ठलनामाचा गजर करत पंढरीच्या दिशेने निघतात, तेव्हा राज्यकर्त्यांनीही या परंपरेबद्दल संवेदनशील असणे अपेक्षित असते. काही नेते ही जबाबदारी केवळ प्रशासकीय कर्तव्य म्हणून पार पाडतात; तर काही जण वारकऱ्यांच्या भावविश्वाचा भाग बनतात.दिवंगत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते. अजितदादांचे वारीशी असलेले नाते हे राजकारणाच्या पलीकडचे होते. त्यांनी अर्थमंत्री म्हणून वारीतील दिंड्यांना आर्थिक बळ देण्याचा निर्णय घेतला.प्रत्येक दिंडीला २० हजार रुपयांचे अनुदान देण्यामागे केवळ आर्थिक मदत नव्हती, तर वारकरी संप्रदायाच्या सेवेला शासनाची साथ असल्याचा संदेश होता. या निर्णयामुळे हजारो दिंड्यांना मोठा आधार मिळाला आणि वारीच्या व्यवस्थापनालाही हातभार लागला.याशिवाय पालखी सोहळ्याच्या स्वागतापासून मुक्कामाच्या व्यवस्थेपर्यंत अनेक बाबींमध्ये त्यांनी वैयक्तिक लक्ष दिले. वारीतील अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्यासाठी प्रशासनाला वेळोवेळी सूचना देणे, वारकऱ्यांच्या सुविधांना प्राधान्य देणे आणि वारीचा प्रवास अधिक सुकर करण्यासाठी प्रयत्न करणे, ही त्यांची कार्यपद्धती होती.त्यामुळे वारकरी त्यांच्याकडे केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर आपल्या माणसाप्रमाणे पाहत होते.



आज अजितदादा आपल्यात नसले तरी त्यांच्या अनुपस्थितीची जाणीव प्रत्येक वारीत प्रकर्षाने होते.अनेक वारकरी त्यांच्या आठवणी सांगताना भावूक होतात. वारीच्या वाटेवर चालताना ज्यांनी वारकऱ्यांचे प्रश्न समजून घेतले,त्यांच्या सेवेला मान दिला आणि शासनाचा हात त्यांच्या पाठीशी उभा केला, अशा नेतृत्वाची उणीव आज जाणवत आहे.वारी ही श्रद्धेची, समतेची आणि सेवाभावाची परंपरा आहे. या परंपरेशी नाळ जोडणारे नेतृत्व समाजाच्या स्मरणात दीर्घकाळ राहते.पद, सत्ता आणि राजकीय समीकरणे बदलत राहतात;परंतु लोकांच्या मनात निर्माण झालेला विश्वास मात्र कायम राहतो. अजितदादांनी वारकऱ्यांच्या मनात मिळवलेले स्थान हे अशाच विश्वासाचे प्रतीक होते. आजच्या काळात वारीकडे केवळ धार्मिक कार्यक्रम म्हणून न पाहता, ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि सामाजिक ऐक्याचा महत्त्वाचा वारसा आहे, या भावनेने तिच्याकडे पाहणाऱ्या नेतृत्वाची गरज अधिक आहे.कारण वारकरी केवळ मदत लक्षात ठेवत नाहीत, तर सेवाभाव, आपुलकी आणि संवेदनशीलता आयुष्यभर जपून ठेवतात. म्हणूनच अजितदादांची आठवण आजही वारीच्या प्रत्येक पावलावर जिवंत असल्याची भावना अनेक वारकरी व्यक्त करतात.हीच त्यांच्या कार्याची खरी पावती म्हणावी लागेल.



**– केतन द. भोज, मुंबई**

## संपादकीय....

# सर्वात मोठी कर्जमाफी

राज्यातील बळीराजाला आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजने'ची व्याप्ती वाढवत, २०१९ मधील 'महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजने'च्या सुमारे २ लाख लाभधारक शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. याशिवाय योजनेतील २६-२७ चा नियमही वगळण्यात येणार असल्याने राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार आहे. अंतिम आठवडा प्रस्तावावरील विरोधकांच्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील शेतकरी हिताला प्राधान्य देत असल्याचे अधोरेखित केले, या योजनेतून केवळ १२ हजार कोटींचाच लाभ मिळेल आणि ३६ लाख शेतकऱ्यांवर अन्याय होईल, हा विरोधकांचा दावा पूर्णपणे खोटा आहे. ही योजना ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे कवच देणारी आतापर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठी कर्जमाफी आहे. मविआच्या काळात महात्मा जोतिबा फुले कर्जमाफी योजनेत २ लाखांपेक्षा एक रुपया जरी जास्त थकबाकी असली तरी शेतकऱ्यांना लाभ मिळाला नाही. मात्र, आमच्या सरकारने २ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनाही या योजनेत सामावून घेऊन २ लाखांपर्यंतची कर्जमाफी दिली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेत, महात्मा फुले कर्जमाफी योजनेतील लाभधारकांना आधी ५० हजारांचा लाभ देण्याचे निश्चित झाले होते. मात्र, आमदार रणधीर सावरकर यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन जनभावना मांडली. त्या पार्श्वभूमीवर, जनभावनेचा आदर करत २०१९ मधील या २ लाख शेतकऱ्यांनाही सरसकट २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचा मोठा निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला. यासोबतच दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांची वीज बिल माफी देखील महायुती सरकार शेतकऱ्यांना दिली. प्रति एक लाख लोकसंख्येच्या आधारावर क्रॉइम रेट मोजला जातो. या निकषानुसार गुन्हेगारीच्या दरात महाराष्ट्र देशात ७ व्या, महिलांवरील अत्याचारात ९ व्या आणि बलात्काराच्या गुन्ह्यांमध्ये देशात १७ व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे महाराष्ट्र सुरक्षित राज्य आहे. राज्यातील 'अपराध सिद्धीचा दर' २००८ मधील ९.४ टक्क्यांवरून ५२.६ टक्क्यांवर पोहोचला असून नवीन कायद्यांमुळे तो ८० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. बेपत्ता महिलांपैकी ९३ टक्के (२ लाख १७ हजार ७५८) महिलांचा शोध घेऊन त्यांना घरी सुखरूप पोहोचवले आहे.

# संघर्षातून घडलेले नेतृत्व : शिक्षण, जिद्द आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणादायी यशोगाथा




**प्राचार्या प्रणाली दहाटे यांच्या वाढदिवसानिमित्त**

काही व्यक्ती पदामुळे मोठ्या होतात, तर काही आपल्या कार्यामुळे. काहींना अधिकार प्रतिष्ठा देतो, तर काहींच्या कर्तृत्वामुळे अधिकारालाही प्रतिष्ठा प्राप्त होते. शासकीय सेवेत काम करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याला जबाबदारी मिळते पण त्या जबाबदारीला संवेदनशीलता, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीची जोड देणारे अधिकारीच समाजाच्या स्मरणात राहतात. अशाच कर्तव्यदक्ष, अभ्यासू आणि जिद्दी व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे प्राचार्या प्रणाली हिरामण दहाटे. ११ जुलै हा त्यांचा वाढदिवस, हा दिवस केवळ शुभेच्छांचा नसून एका संघर्षमय प्रवासाचा, शिक्षणाच्या सामर्थ्याचा आणि जिद्दीने घडवलेल्या यशाचा गौरव करण्याचा दिवस आहे.

आज त्या महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत भंडारा जिल्ह्यातील साकोली येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या तसेच राजुरा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेल्या संस्थेचे नेतृत्व करताना त्यांनी प्रशासनातील पारदर्शकता, शिस्त, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि गुणवत्तापूर्ण कौशल्य विकास यांचा सुंदर संगम घडवून आणला आहे. परंतु या यशामागे संघर्षाचा दीर्घ इतिहास दडलेला आहे.

अमरावतीच्या एका सर्वसामान्य कुटुंबात त्यांचे बालपण गेले. होली क्रॉस शाळेतून दहावी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी शासकीय पॉलिटेक्निक, अमरावती येथून प्रथम श्रेणीत डिप्लोमा पूर्ण केला. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून अभियांत्रिकी पदवी विशेष प्राविण्यासह संपादन केली आणि पुढे नागपूर येथील जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातून एम.टेक. पूर्ण केले. प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेचा ध्यास कायम ठेवत त्यांनी स्वतःची वाट स्वतः निर्माण केली.

त्यांच्या घरची परिस्थिती अत्यंत साधी होती. वडील राज्य परिवहन महामंडळात बस कंडक्टर म्हणून कार्यरत होते. चार मुली आणि एका मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी पेलताना आर्थिक मर्यादा स्वाभाविक होत्या. अशा परिस्थितीत शिक्षणाची वाटचाल शक्य झाली ती शिष्यवृत्तीच्या आधारावर. त्या नेहमी कृतज्ञतेने सांगतात की, शिष्यवृत्ती नसती तर कदाचित उच्च शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले नसते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणासाठी निर्माण केलेल्या घटनात्मक संधी आणि सामाजिक न्यायाच्या विचारांबद्दल त्यांना विशेष आदर आहे. वडिलांनी दिलेला सर्वात मोठा वारसा म्हणजे संपत्ती नव्हे, तर जिद्द, प्रामाणिकपणा आणि संकटात न डगमगण्याची ताकद. आयुष्यभर कष्ट करून त्यांनी मुलांना एकच धडा दिला परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण सोडायचे नाही. हाच धडा पुढे प्रणाली दहाटे यांच्या संपूर्ण आयुष्याचा आधारस्तंभ ठरला.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पॉलिटेक्निकमध्ये व्याख्याता म्हणून अध्यापन सुरू केले. अध्यापनाबरोबरच त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारीही सुरू ठेवली. लग्नानंतर अनेकांची स्वप्ने बदलतात पण त्यांनी स्वप्नांचा पाठलाग सोडला नाही. २०१४ मध्ये त्यांनी शासकीय पॉलिटेक्निक व्याख्याता आणि आयटीआय प्राचार्य पदांच्या परीक्षा दिल्या आणि दोन्ही परीक्षांमध्ये यश मिळवले. मात्र नियतीने त्यांची खरी परीक्षा अजून बाकी ठेवली होती. २०१५ मध्ये व्याख्याता पदाच्या मुलाखतीसाठी त्यांना मुंबईला बोलावण्यात आले. त्या वेळी गर्भारपणाचा आठवा महिना सुरू होता. डॉक्टरांचा सल्ला, घरच्यांची काळजी आणि प्रवासाचा धोका यामुळे त्यांनी मनावर दगड ठेवून आपल्या स्वप्नातील संधीचा त्याग केला. एखाद्याला वाटेल, इतके कष्ट करूनही नशिबाने साथ दिली नाही, पण संघर्षाला घाबरणाऱ्या त्या नव्हत्या.

प्रसूतीनंतर काही दिवसांतच पुन्हा दुसऱ्या मुलाखतीसाठी बोलावणे आले. नुकतीच गंभीर प्रसूती झालेली, अंगात ताप, नीट चालताही येत नव्हते आणि कुशीत अवघे वीस दिवसांचे बाळ. अशा वेळी अनेकांनी आता नको असेच सांगितले असते. परंतु त्यांचे पती त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले. त्यांनी धैर्य दिले, विश्वास दिला आणि तू हा इंटरव्ह्यू देणारच असा आग्रह धरला. त्या मुंबईला गेल्या, मुलाखत दिली आणि उपस्थित सर्वांना त्यांच्या जिद्दीने प्रभावित केले. निकाल काय लागेल, याची खात्री नव्हती, पण प्रयत्न मात्र अपूर्ण राहिला नाही. काही काळानंतर नियुक्ती आदेश आला आणि त्यांच्या संघर्षाला यशाचे सुंदर बक्षीस मिळाले. त्यांचा मुलगा तेव्हा दोन वर्षांचा झाला होता. त्याचे नाव त्यांनी 'कौतुक' ठेवले, कारण तो त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, आशा आणि यशाचा साक्षीदार होता.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

२०१७ मध्ये त्या चंद्रपूर येथील मुलींच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्राचार्य (गट-ब) म्हणून रुजू झाल्या. शासकीय सेवा ही केवळ पद नसते तर ती सतत शिकण्याची आणि जबाबदाऱ्या स्वीकारण्याची प्रक्रिया असते. अनेक प्रशासकीय अडचणी, मर्यादा आणि आव्हाने आली पण त्यांनी प्रत्येक प्रश्नाकडे समस्येऐवजी संधी म्हणून पाहिले. संस्थेची गुणवत्ता, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, शिक्षकांचे समन्वय आणि प्रशासनातील पारदर्शकता यांना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. आठ वर्षांच्या यशस्वी सेवेनंतर त्यांना वर्ग-१ अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आणि साकोली येथे प्राचार्या म्हणून नवीन जबाबदारी स्वीकारण्याची संधी मिळाली. आज त्या विभागात कर्तव्यदक्ष, निर्णयक्षम आणि विद्यार्थीकेंद्रित अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. कौशल्य विकास ही केवळ सरकारी योजना नसून युवकांच्या भविष्याचा पाया आहे, या विश्वासाने त्या सातत्याने कार्यरत आहेत.

आज देशाला रोजगारक्षम, प्रशिक्षित आणि आत्मनिर्भर युवकांची गरज आहे. उद्योगांना कुशल मनुष्यबळ हवे आहे. अशा वेळी आयटीआयसारख्या संस्था राष्ट्रनिर्मितीचे केंद्र बनतात. त्या संस्थांचे नेतृत्व करणारे अधिकारी म्हणजे भविष्यातील भारत घडवणारे शिल्पकार असतात. प्रणाली दहाटे यांचे कार्य या व्यापक राष्ट्रीय ध्येयाशी जोडलेले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे साधेपणा. पद वाढले, जबाबदाऱ्या वाढल्या, परंतु पाय मात्र जमिनीवरच राहिले. विद्यार्थ्यांशी संवाद, सहकाऱ्यांशी सुसंवाद, कामातील शिस्त आणि निर्णयातील पारदर्शकता यामुळे त्यांनी विश्वासार्ह अधिकारी म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा संपूर्ण जीवनप्रवास एक महत्त्वाचा संदेश देतो की, गरीबी अडथळा असू शकते पण ती यशाचा अंत नसते. योग्य संधी, शिक्षण, जिद्द आणि कुटुंबाचा विश्वास असेल तर कोणतीही मुलगी उच्च पदापर्यंत पोहोचू शकते.प्रशासकीय जबाबदाऱ्यांमुळे सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय राहणे शक्य होत नसले, तरी त्यांना आंबेडकरी विचारांची मांडणी करणाऱ्या 'कोण म्हणतो टक्का दिला?' या नाटकात अभिनय करून वैचारिक चळवळीचा एक छोटासा भाग होण्याचे भाग्य लाभले. चंद्रपूर येथे या नाटकाचे काही यशस्वी प्रयोगही झाले. समाजप्रबोधनाच्या अशा सांस्कृतिक माध्यमातून योगदान देता आले, ही त्यांच्या करिता कायमची समाधानाची बाब आहे.

आज समाजात मुलींच्या शिक्षणाबद्दल बोलले जाते, परंतु प्रणाली दहाटे यांचा प्रवास हे त्या विचाराचे जिवंत उदाहरण आहे. संघर्ष हा त्यांच्या आयुष्याचा अध्याय होता, शिक्षण त्यांची ताकद होती, जिद्द त्यांची ओळख ठरली आणि कर्तव्यनिष्ठा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी सही बनली. शिष्यवृत्तीवर शिक्षण घेणारी एक विद्यार्थीनी पुढे वर्ग-१ अधिकारी बनते, हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याची जबाबदारी स्वीकारते आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीत योगदान देते. यापेक्षा प्रेरणादायी प्रवास कोणता? ११ जुलैच्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा! त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, अखंड कार्यऊर्जा आणि अधिक व्यापक यश लाभो. त्यांच्या नेतृत्वाखाली आणखी अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी दिशा मिळो, अनेक कुटुंबांचे भविष्य उजळो आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची ही वाटचाल अधिक वेगाने पुढे जावो, हीच मनःपूर्वक सदिच्छा.

# मुंबई-पुणे रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा; आजपासून धावणार २०० अतिरिक्त बसफेऱ्या

(पान १ वरून...) एक उत्तम पर्याय उपलब्ध होणार आहे.

गर्दी वाढल्यास आणखी बसेस सोडणार

एसटी प्रशासन केवळ या २०० फेऱ्यांवरच थांबणार नसून, प्रवाशांच्या गर्दीवर बारीक लक्ष ठेवून आहे. प्रवाशांची संख्या वाढल्यास संबंधित आगार आणि विभागांना आवश्यकतेनुसार जागेवरच आणखी जादा बसेस सोडण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. कोणत्याही प्रवाशाला वाहतुकीअभावी ताटकळत राहावे लागू नये, यासाठी एसटी प्रशासन २४ तास परिस्थितीवर नियंत्रण ठेवून आहे. संकटाच्या प्रत्येक काळात एसटीने जनतेचा विश्वास सार्थ ठरविला आहे. रेल्वे सेवा बाधित झाल्यानंतरही प्रवाशांचा प्रवास सुरळीत राहावा, यासाठी एसटी महामंडळ पूर्ण क्षमतेने सज्ज आहे. प्रवाशांची सुरक्षितता, सोय आणि वेळेवर सेवा हेच आमचे सर्वोच्च प्राधान्य असून, गरजेनुसार आणखी अतिरिक्त बससेवा उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे.

लाखो प्रवाशांचा प्रवास होणार सुलभ

ऐन गर्दीच्या काळात मुंबई-पुणे रेल्वे सेवा प्रभावित झाल्याने प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र, एसटी महामंडळाने दाखवलेल्या या तत्परतेमुळे लाखो प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या या अतिरिक्त बसेसमुळे दोन्ही शहरांमधील प्रवास अधिक सुलभ आणि सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

# आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्यासमोर कार्याचा लेखाजोखा; सामाजिक परिवर्तनाची ३८ वर्षांची वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव (सतिश राठोड ) :- तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव, मारुती बनसोडे यांनी महाराष्ट्र राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे मॅडम यांची सदिच्छा भेट घेऊन संस्थेच्या वतीने सन्मान केला. यावेळी संस्थेच्या गेल्या ३८ वर्षांच्या सामाजिक कार्याची माहिती देत विविध उपक्रमांचा आढावा सादर केला.

परिवर्तन सामाजिक संस्था गेली अनेक वर्षे सामाजिक परिवर्तनासाठी सातत्याने कार्यरत असून अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, पोतराज प्रथा निर्मूलन, महिला सक्षमीकरण, ग्राम विकास, जलसंवर्धन, पंचायतराज, शेतकरी, विधवा व निराधारांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करत आहे. संस्थापक सचिव, मारुती बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने ग्रामीण भागात सामाजिक प्रबोधनाची चळवळ उभी केली आहे.

संस्थेच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने मारुती बनसोडे यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान करून गौरविले आहे. व्यसनमुक्ती आणि सामाजिक जनजागृती क्षेत्रातील त्यांच्या कार्याला राज्यस्तरावर मान्यता मिळाली आहे. सन २००५ मध्ये जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात आलेल्या जलस्वराज प्रकल्पात परिवर्तन सामाजिक संस्थेने सपोर्ट ऑर्गनायझेशन म्हणून सहा गावांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच कळंब तालुक्यातील ३१ गावांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प यशस्वीपणे राबवून जलसंवर्धनाच्या कार्यातही संस्थेने मोलाचे योगदान दिले. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन प्रकल्पात संस्था परंडा, कळंब, तुळजापूर तालुक्यातील १७ गावातून जवळपास ४० हजार शेतकऱ्यांना जाणीव जागृती, प्रशिक्षण व अभ्यास सहल या माध्यमातून प्रभावी काम केले आहे. धाराशिव जिल्ह्यातील भटके,विमुक्त, आदिवासी लोकांना शासनाच्या माध्यमातून विशेष अभियान राबवून त्यांना आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचे दाखले घरकुल मिळवून दिले आहेत व ज्यांचे नाव मतदार यादीत नाही अशा लोकांचे नाव समाविष्ट करण्यासाठी काम केले आहे या कालावधीत जिल्ह्यात वीस हजार मतदार वाढले होते या कार्याची दखल राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दखल घेऊन २४ जानेवारी २०२४ रोजी मुंबई येथे परिवर्तन सामाजिक संस्थेला संस्थात्मक लोकशाही मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तर जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते ही सन्मान पत्र देऊन २५ जानेवारी २०२४ रोजी धाराशिव येथे संस्थेचा गौरव करण्यात आला. आणि २६ जानेवारी २०२४ रोजी तत्कालीन पालक मंत्री मा. ना. डॉ. तानाजी सावंत साहेब यांच्या हस्ते शासकीय कार्यक्रमात प्रशस्ती पत्र देऊन सन्मान करण्यात आला आहे. तर यापूर्वी २६ जानेवारी २००२ रोजी तत्कालीन पालक मंत्री मा. ना. बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते संस्थेस युवक कल्याण व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल नेहरू युवा संस्था पुरस्कार देऊन ही सन्मानित करण्यात आले होते.



अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रात संस्थेने विशेष कार्य करत १५२ बाल पोतराजांना पोतराज प्रथेतून मुक्त करून त्यांच्या पुनर्वसन, शिक्षण व रोजगारासाठी प्रयत्न केले. त्यांनी पोतराज प्रथा यावर संशोधन ही केले आहे.एकेकाळी अंधश्रद्धेचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तुळजापूर परिसरात विज्ञाननिष्ठ व विवेकवादी विचारांची पेरणी करण्यात संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. केवळ आंदोलनापुरते मर्यादित न राहता सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी पुनर्वसन आणि जनजागृतीवर संस्थेने सातत्याने भर दिला. याशिवाय व्यसनमुक्ती अभियान, महाराष्ट्र राज्य नशाबंदी मंडळाचे धाराशिव जिल्हा संघटक म्हणून कार्य, चिंवरी पशुहत्या विरोधी आंदोलन, महिला बचत गटांची उभारणी, विधवा, निराधार व शेतकरी यांच्या विविध प्रश्नांवर पाठपुरावा, पंचायतराज विषयक जनजागृती तसेच पौष्टिक तृणधान्य अभियान अशा विविध उपक्रमांमधून संस्थेने समाजहिताचे कार्य केले आहे. यावेळी परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांनी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून संस्थेला विविध सामाजिक विकास व जनकल्याणकारी उपक्रम राबविण्याची संधी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्याकडे केली. संस्थेच्या दीर्घकालीन सामाजिक कार्याची दखल घेऊन शासनाकडून आवश्यक सहकार्य मिळावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. परिवर्तन सामाजिक संस्था आज धाराशिव जिल्ह्यात सामाजिक बांधिलकी, जनजागृती आणि परिवर्तनवादी कार्यासाठी ओळखली जाणारी अग्रगण्य संस्था म्हणून नावारूपास आली असून, तिच्या कार्याची दखल विविध स्तरांवर घेतली जात आहे.

सतीश राठोड
पत्रकार खुदावाडी

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# वाहून जाणारे पावसाचे पाणी आवताडेंच्या मागणीनुसार म्हैसाळ योजनेला सोडले, मंगळवेढ्याच्या दक्षिण भागाला दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा/ पंढरपूर प्रतिनिधी : कृष्णा, पंचगंगा नदीचे पावसाच्या पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी म्हैसाळ योजनेच्या कालव्यात सोडून मंगळवेढा तालुक्याचे जलसंकट दूर करणेबाबत आ समाधान आ- वताडे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देऊन मागणी केली होती त्या मागणीची दखल घेऊन म्हैसाळ योजनेचे पाणी कालव्याद्वारे सोडले असून याचा मंगळवेढा तालुक्यातील दक्षिण भागाला मोठा फायदा होणार आहे.

आ आवताडे यांनी मागणी केलेल्या पत्रात असे म्हटले आहे की सध्या कृष्णा आणि पंचगंगा नदी परिसरात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असून आगामी दिवसात पावसाचा जोर वाढल्यास सदर नदीपात्रात पूर, महा- पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यात आहे. सोलापूर जिल्ह्यात तसेच माझ्या पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात अद्यापही पावसाने ओढ दिली असून पेरणी करण्यास अनुकूल स्थिती अद्यापही नाही. त्यामुळे या भागातील शेतकरी पाणी आणि पेरणी या दोन्हीपासून संकटात सापडला आहे.

दरम्यान सध्या कृष्णा आणि पंचगंगा नदीतील अतिरिक्त वाहून जाणारे पाणी म्हैसाळ योजनेच्या वितरिका १ आणि २ तसेच उमदी वितरिका लगत असलेल्या गावातील नागरिकांना पिण्याचे तसेच शेतीसाठी (जनावरांना) दिल्यास या भागातील गावांवर असलेले जलसंकट टळेल.गतवर्षीच्या खरीप आणि रब्बी हंगामात मध्ये म्हैसाळ योजनेचे पाणी मंगळवेढा तालुक्यासाठी एक थेंबही मिळालेले नाही सध्या हे कालवे कोरड्या अवस- थेत असून कृष्णा व पंचगंगा नदीतील वाहून जाणारे



अतिरिक्त पाणी या कालव्यात सोडल्यास मोठा दिलासा या भागातील शेतकऱ्यांना, नागरिकांना मिळेल.

तरी, मी आपणास विनंती करतो की, कृष्णा, पंचगंगा नदीचे पावसामुळे पुराचे अतिरिक्त वाहून जाणारे पाणी म्हैसाळ योजनेच्या वितरिका १ आणि २, तसेच उमदी वितरिका कालव्यात सोडण्याबाबत संबंधितांना आदेश करावे, अशी मागणी आ आवताडे यांनी केली होती याची दखल घेत म्हैसाळ योजनेतून पाणी सोडण्यात आले असल्याचे कार्यकारी अभियंता मासाळ यांनी सांगितले .

## निरा भाटघर (NRBC) चे पाणीही पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना कॅनलद्वारे मिळणार

**वीर धरणाच्या परिसरामध्ये मुसळधार पावसामुळे निरा भाटघर धरणाच्या पाणी पा- तळी साठ्यात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे ६००० क्यूसेक पाणी निरा नदीत सोडले आणि ते पाणी निरा नरसिंगपूर येथून भीमा नदीमध्ये मिळणार असून ते पाणी सोलापूर च्या खाली कर्नाटक भागामध्ये जाणार आहे. भीमा नदीच्या काटचे जे शेतकरी आहेत त्यांना शेतीपंपासाठी २ तास लाईट ठेवल्यामुळे पाईपलाईन सुद्धा भरत नसल्या कारणाने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाण नाहक त्रास सहन करावा लागत आहे.त्या ठिकाणी ८ तास विजपुरवठा करण्याची मागणी केली असून ती ही मागणी मान्य केली असून दोन दिवसात आठ तास विजपुरवठा होणार आहेत त्याचबरोबर पंढरपूर तालुक्यातील कॅनॉलच्या लाभ क्षेत्रातील गावांना वीर धरण भरत आल्यामुळे शेतीला पाणी सोडण्यात यावे, या भागामध्ये पाऊस अजिबात नसल्यामुळे शेतकरी हवालदील झालेला असून पंढरपूर तालुक्यातील लाभ क्षेत्रातील गावांना तात्काळ कॅनलद्वारे पाणी सोडण्यात यावे. अशी मागणी आ आवताडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली होती त्याप्रम ाणे पंढरपूर तालुक्यातील कॅनॉल मध्येही पाणी सोडण्यात आले असल्याचे सांगितले.**

# श्री विठ्ठल-रुक्मिणीचे व्हीआयपी दर्शन दिल्यास संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल होणार

## जिल्हाधिकारीचे कडक आदेश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. भाविकांना सुलभ व सुरळीत दर्शन मिळावे यासाठी दिनांक १५ जुलैपासून व्हीआयपी दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाही करण्यात येईल. फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे आदेश, सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्तीकयन एस. यांनी आदेश जारी केले आहे.

त्यामुळे व्हीआयपी दर्शन च्या नावाखाली गैरप्रकार करणाराचे दावेदनानले आहेत. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात काही दलाल. धनाड्य भावीराकडून पैसे घेऊन त्यांना व्हीआयपी दर्शन घडवून आणत आहेत अशा तक्रारी सातत्याने घडत आहेत. व नियमित भारत उभा असलेल्या भाविकांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागतो.

आषाढी यात्रेदरम्यान भाविकांची मोठी गर्दी पाहून मंदिर समितीने दर्शन व्यवस्थेचे काटेकोरपणे नियोजन केले आहे. कोणत्याही भाविकांनी आमदार खासदार व मंत्री यांच्या शिफारसह येण- ारे भाविकांना व्हीआयपी दर्शन देऊ नये. स्पष्ट निर्देश देण्यात आले आहे. तसेच दलाल व इतर नेमबाही व्यक्ती व्हीआयपी दर्शन करताना आढळल्यास त्यांच्यावर संबंधितांवर तातडीने फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.

व्हीआयपी दर्शनावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी मंदिर समि तीने विशेष भरारी पथके नियुक्त करावीत. तसेच मंदिर समिती सीसीटीव्ही कॅमेरे द्वारे सतत देखरेख ठेवावी, अशा सूचना ही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे.

# भीमा खोऱ्यातील दमदार पावसामुळे पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ, शेतकऱ्यांना दिलासा; उजनी धरणाची ५०% कडे वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : भीमा नीरा खोऱ्यासह दमदार घाट माथ्यावर झालेल्या दमदार पावसामुळे, दौंड येथून उजनी धरणामध्ये मोठ्या प्रम ाणात पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे उजनी धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढत असून. उणे २७% असलेला पाणीसाठा आता ४३ टक्के वाढत आहे. त्यामुळे धरणाची वाटचाल ५०% कडे सुरू असून. शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. एकदा जून महिन्यात अपे- क्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने. उजनी धरणाच्या पाणीसाठ्यामध्ये कोणतीही लक्षणे वाढत झाली नाही. धरणात ऊणे २७% पाणीसाठा होता त्यामुळे शासनाने पिण्याच्या पाण्यासाठी, राखीव ठेवला होता. पाऊस लांबल्याने खरीप हंगामाचे शेतकऱ्यांची चिंता वाढली होती. जुलै महिन्याच्या सुरुवातीपासूनच भीमा निरा खोऱ्यात व घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस सुरू झाल्यामुळे दौंड येथून उजनी धरणात सुमारे एक लाख ६० हजार क्युसेक्स चा पाण्याची आवक झाली आहे. उजनी धरणामध्ये पाण्याची मोठी वाढ झाली असून गुरुवारी सायंकाळी परत ४३% पोचली आहे. दरम्यान भीमा , नीरा खोऱ्यामध्ये दमदार पाऊस असल्यामुळे येणारे पाण्याची आवक अजूनही वाढली आहे. शुक्रवारी सकाळी सहा वाजता दौंड इथून २०००० क्यू सेक्स पाणीसाठा येत आहे. भीमा , निरा घाटमाथ्यावर म ोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यास उजनी धरणामध्ये पाणीसाठा झाल्यास उजनी धनातील पाण्याचे पातळी वाढेल असे जलसंधारण विभागाकडून सांगण्यात आले आहे.

# निफाडला मतदारांसाठी विशेष शिबिराचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायतीत उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, मुख्याधिकारी धीरज भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सघन पुनरीक्षण (ङखठ) कार्यक्रमांतर्गत भाग क्र. १८६ व १८७ मधील मतदारांसाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बेघर वस्ती आणि बरड वस्ती परिसरातील मतदारांना अनिल पा. कुंदे यांच्याकडून आवश्यक माहिती व मदत देण्यात आली.

ही मोहीम मतदार यादी अद्ययावत, अचूक आणि सर्वसम ावेशक करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ङखठ उपक्रमाचा भाग आहे. मतदारांनी आपली नोंद, दुरुस्ती व कागदपत्रांची पडताळणी यासाठी अशा शिबिरांना सहकार्य करणे अपेक्षित आहे.असे अनिल पाटील कुंदे यांच्याकडून सांगण्यात आले

यावेळी महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते

# स्वच्छता ही वृक्षसंवर्धन.... वृक्षांचे संगोपन...!



गोंदिया तालुक्यातील नंगपुरामुर्री येथील छत्रपती शिवाजी महाराज पब्लिक स्कूल (अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा) या शाळेतील विद्यार्थ्यांनी शालेय परिसरातील परसबागेतील हिरवा कचरा, केर, गवत काढून स्वच्छता ही वृक्षसंवर्धन....वृक्षांचे संगोपन असा मौल्यवान संदेश दिला.

**छायाचित्र – मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया**

# आंगवली विकास मंडळ मुंबई संचलित, जनता विद्यालय आंगवली या शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**जनता विद्यालय आंगवली प्रशालेतील दोन विद्यार्थिनी इ.आठवी शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये गुणवत्ता यादीत**





मुंबई/केतन भोज : रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालूक्याम धील आंगवली विकास मंडळ म ुंबई संचलित,जनता विद्यालय आंगवली या प्रशालेच्या दोन विद्यार्थिनींनी इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळा व परिसराचे नाव रोशन केले आहे. कुमारी स्वरा अमोल प्रभावळकर व कुमारी श्रृती संतोष भिसे यांची शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत निवड झाली आहे.

यशामागे शाळेचे मुख्याध्यापक श्री.ए. आर. चव्हाण,शिक्षक सौ.के व्ही जाधव,श्रीम.एस. जी पेडणेकर व श्री.एस.एच जाधव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच संस्था पदाधिकारी यांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन व प्रेरणा विद्यार्थिनींच्या यशामध्ये महत्त्वाचे ठरले विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे, मार्गदर्शक शिक्षकांचे व पालकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून आंगवली सारख्या ग्रामीण भागातील शाळेतून विद्यार्थिनींनी मिळविलेल्या या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

## उपविभागीय दंडाधिकारी इथापे यांनी आदेश केले जारी

# शेगाव दुमाला चौक ते जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभारण्यास मनाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : आषाढी यात्रेच्या अनुषंगाने शेगाव दुमाला चौक ते तीन रस्ता, जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभारण्यास, हातविक्री करण्यास तसेच हॉटेल्स, स्टॉल्स लावण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्रतिबंध करण्यात आला असून, याबाबतचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी जारी केले आ- हेत.

आषाढी एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होणार असून, यात्रा कालावधी १५ ते २९ जुलै २०२६ असा आहे. या सोहळ्याच्या कालावधीत लाखो भाविक श्री. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी व चंद्रभागा स्नानासाठी पंढरपूरला येतात. आषाढी एकादशीला येण- ारे भाविक चंद्रभागा नदीपात्राल- गतच असणा-या शेगाव दुमाला येथील भक्तीसागर (६५एकर) येथे वास्तव्यास असतात. त्यामुळे शेगाव दुमाला चौक ते तीन रस्ता या परिसरात भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी असते. आषाढी यात्रेसाठी येणारे भाविक भक्तीसागर (६५ एकर) परिसरात वास्तव्यास असल्यामुळे सदरच्या ठिकाणी म ोठया प्रमाणात दुकाने, हातविक्रेते, तात्पुरती हॉटेल्स, स्टॉल्स लागतात. चंद्रभागा नदीपात्रातील दगडी पूल ते तीन रस्त्यावर भाविकांची, वाहनांची मोठया प्रमाणात गर्दी होवून अपघ- ात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेगाव दुमाला ते तीन रस्ता या परिसरात मोठ्या प्रम ाणात गर्दी होवून चेंगराचेंगरीसारखी घडू नये, यासाठी शेगाव दुमाला रस्ता ते तीन रस्ता, जुना दगडी पूल या ठिकाणी दुकाने उभारण्यास, हातविक्री करण्यास तसेच हॉटेल्स, स्टॉल्स लावण्यास मनाई करण्यात आली आहे

सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# महूदमध्ये दिवसा ढवळ्या घरफोडी; कुलूप तोडून चार लाख ८० हजाराचा ऐवज लंपास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यातील महूद या गावात घराला कुलूप असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने दिवसाढवळ्या घरपोडी करून चार लाख ८० हजार रुपयाची सोन्याची दागिने आणि रोख रक्कम लंपास केले की धक्कादाय घटना उघड झाली आहे या घटनेमुळे महोत्सव परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे याप्रकरणी सांगोला पो- लीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध घरपोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपासाची चक्री वेगाने फिरवली आहेत.

फिर्यादी संजय शिवराम बाज- ारी (वय ५८ राहणार मोहोळ तालुका सांगोला) हे पंढरपूर रोडवरील गाडी फाटा येथे खडी क्रेशरचा व्यवसाय करतात दिनांक ०६ जुलै २०२४ रोजी त्यांच्या सासऱ्याचे निधन झाल्याने संपूर्ण कुटुंबाने मोहदी येथील घराला कुलूप लावून सातारा येथे अंत्यविधीसाठी प्रस्थान केली होती व अंत्यविधीनंतर ते तिथेच मुक्कामी थांबले होते दरम्यान आठ जुलै रोजी सकाळी पाच वाजता फिर्यादी आणि त्यांचे पुतणे मयूर बाजारे यांनी फोन करून घराचे मुख्य कुलूप तोडले गेले असून घरातील कपाटातील साहित्य आस्था वेस्ट पडल्याची माहिती दिली व ही माहिती मिळतात बाजारी कुटुंब तातडीने मोहोळ येथे परतले. मग घरी आल्यानंतर मुख्य दरवाज्याचे कुलूप तुटलेली अवस्थेत घराजवळ पडलेली दिसली व घरातील बेडरूम मधील लोखंडी कपाटाची उचकापाचक करण्यात आली होती व कपाटात ठेवलेली रोख रक्कम आणि सोन्याची दागिने गायब झाल्याची निदर्शनास येतात अज्ञात चोट्याने घर पुढे केल्याची स्पष्ट झाले.

चोरीस गेलेला ऐवज

₹ ८०,००० रोख रक्कम

₹२,००,००० किमतीचा चार तोळे वजनाचा सोन्याचा राणीहार.

₹१,५०,००० किमतीचे अडीच तोळे वजनाचे सोन्याचे नेकलेस.

₹५०००० किमतीची एक तोळा वजनाची सोन्याची खड्याची अंगठी.

एकूण चोरीचा ऐवज: ४,८०,०००

खेळतीच्या जबाबानुसार दिनांक सात जुलै रोजी रात्री ११.३० ते दिनांक आठ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता या कालावधीत अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून आज प्रवेश केला आणि कपाटातील मौल्यवान दागिने व रोग रक्कम चोरून नेली व घरातील इतर वस्तूंची तप- ासणी सुरू केली असून आणखी काही साहित्य चोरीच गेले आहे का याचाही तपासी सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच सांगोला पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला तसेच विविध पुरावी संकलित केली व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तांत्रिक माहिती आणि इतर धागेद्वारांच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून लवकरच या गुन्ह्याचा छडा लागेल असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

महूद परिसरात अलीकडे घरपोडींच्या घटनांची वाढ होत असल्याने नागरिकांनी घरबंद करून बाहेर जाताना विश्वासू शेजाऱ्यांना माहिती देणे किंवा सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे तसेच मौल्यवान दागिने आणि मोठ्या प्रमाणे रोग रक्कम सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# पडघ्यात टोरेंट पॉवरच्या ढिसाळ कारभाराविरोधात शिवसेना (उबाठा) आक्रमक; नियमित वीजपुरवठ्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा व परिसरात टोरेंट पॉवरकडून वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोंईर यांनी टोरेंट पॉवर लिमिटेडच्या व्यवस्थापनाला सविस्तर निवेदन सादर केले आहे. या निवेदनाद्वारे नियमित व अखंड वीजपुरवठा, तातडीची दुरुस्ती आणि ग्राहकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पडघा व परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने घरगुती ग्राहक, व्यापारी, लघुउद्योग, शेतकरी, विद्यार्थी, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनियमित वीजपुरवठ्यामुळे दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत असून अनेक व्यावसायिकांचे आर्थिक नुकसानही होत आहे.

याशिवाय, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा विस्कळीत होत आहे. पाणी शुद्धीकरण यंत्रणा बंद पडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक भागांत दीर्घकाळ वीज नसल्याने नागरिकांना उष्णतेचा त्रास सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही विपरीत परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रकाश भोंईर यांनी नियंत्रण कक्षाच्या कार्यपद्धतीवरही नाराजी व्यक्त केली आहे. तक्रार

**उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोंईर यांचे टोरेंट पॉवरला निवेदन; वारंवार वीज खंडित, पाणीपुरवठा, उद्योग व विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान**

नोंदविण्यासाठी संपर्क साधणे कठीण जात असल्याने ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. तसेच तक्रारींवर वेळेत कार्यवाही होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडित होण्यामागील कारणांची माहिती नागरिकांना पारदर्शकपणे देण्यात यावी, वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मर, फीडर आणि अन्य विद्युत यंत्रणांची नियमित तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवून प्रत्येक तक्रारीवर तातडीने कार्यवाही करावी, पिण्याच्या पाण्याच्या योजना व बोअरवेलच्या वीजजोडण्या अखंडित ठेवण्यासाठी स्वतंत्र नियोजन करावे तसेच ग्राहकाभिमुख व उत्तरदायी सेवा देण्यासाठी आवश्यक प्रशासकीय सुधारणा तातडीने राबवाव्यात, अशा प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.

यावेळी प्रकाश भोंईर यांनी इशारा देत सांगितले की, नागरिकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधित शासकीय प्राधिकरण, नियामक संस्था तसेच ग्राहक तक्रार निवारण मंचाकडे दाद मागण्यात येईल. पडघा व परिसरातील नागरिकांना अखंड, सुरक्षित आणि विश्वासार्ह वीजपुरवठा मिळावा, हीच या निवेदनामागील मुख्य भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

टोरेंट पॉवरची भूमिका :

दरम्यान, या तक्रारीबाबत आमच्या प्रतिनिधीने टोरेंट पॉवरच्या व्यवस्थापनाशी संपर्क साधला असता, कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की,

मागील काही दिवसांत झालेल्या मुसळधार पाऊस आणि पूरपरिस्थितीमुळे पडघा व परिसरातील काही भागांतील वीज यंत्रणांवर परिणाम झाला होता. त्यामुळे काही ठिकाणी वीजपुरवठ्यात व्यत्यय निर्माण झाला. अशा परिस्थितीत आमच्या तांत्रिक पथकांनी युद्धपातळीवर दुरुस्तीची कामे करून शक्य तितक्या लवकर वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न केले. ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचीही गंभीर दखल घेण्यात आली असून, निवेदनातील सर्व मुद्द्यांची तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. भविष्यात अशा समस्या कमी करण्यासाठी देखभाल आणि तांत्रिक सुधारणा सुरू आहेत.

# मंत्रालयात सीना-माढा व खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजनांबाबत महत्त्वपूर्ण बैठक

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर सरकार सकारात्मक; आमदार अभिजीत पाटील यांच्या पुढाकारातून यशस्वी बैठक संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जलसंधारण व जलसंपदा मंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे सीना-माढा उपसा सिंचन योजना तसेच खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनाशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी सीना-माढा उपसा सिंचन योजनेत तुळशी, बावी, परितेवाडी, अंजनगाव (खे.), कुर्डू, अंबाड व पिंपळखुटे या सात गावांचा समावेश करणे, सुमारे २० वर्षे जुन्या झालेल्या मोटारींच्या जागी नवीन मोटारी बसविणे, सीना नदीच्या बोगद्यात नियोजनबद्ध पद्धतीने पाणी सोडणे, खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजना तातडीने सुरू करणे, प्रकल्पासाठी संपादित झालेल्या जमिनीवरील फळझाडांच्या प्रलंबित नुकसानभरपाईचे तातडीने वाटप करणे तसेच नदीकाठावरील विस्कळीत विद्युत व्यवस्था सुरळीत करण्याच्या मागण्या करण्यात आल्या.

मा. मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्व मागण्या गांभीर्याने ऐकून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सीना-माढा उपसा सिंचन प्रकल्प व खैराव-मानेगाव उपसा सिंचन योजनेची कामे गतीने पूर्ण करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

माढा तालुक्यातील शेतकरी बांधवांच्या सिंचनासंदर्भातील प्रलंबित प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी आमदार नारायण पाटील, भारत शिंदे, अमोल गायकवाड, विजय भगत, शरद मोरे, प्रकाश चोपडे, राजाभाऊ भांगिरे, संजय भोंगे, राजु भानवासे, गणेश गुंडगिरे, बंडु घाडगे, अजिंक्य काटकर, बालाजी टोणपे, रामकृष्ण चोपडे, बाळासाहेब चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.




# प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशाचा कॅप राऊंड-१ शनिवारपासून सुरु

**दि.१३ जुलै पर्यंत चालणार प्रक्रिया**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशाची पहिली फेरी (फर्स्ट कॅप राऊंड) शनिवार, दि. ११ जुलै २०२६ पासून सुरु होणार असून ती प्रक्रिया सोमवार, दि.१३ जुलै २०२६ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत चालणार आहे. या कालावधीत स्वेरी डिप्लोमाच्या फॅसिलिटेशन सेंटर (एफ. सी. क्रमांक ६४३७) मध्ये कॅप राउंड साठी ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची सोय केली आहे. या प्रवेश फेरीची अलॉटमेंट यादी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर बुधवार दि.१५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे.' अशी माहीती स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पॉलीटेक्निक) चे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी दिली.

सन २०२६-२७ च्या पदविका अभियांत्रिकीच्या प्रवेशाकरीता यापूर्वीच ऑनलाईन रजिस्ट्रेशन फॉर्म भरणे, भरलेले अर्ज स्विकारुन कागदपत्रांची तपासणी, पडताळणी, अर्ज निश्चित करणे आदी प्रक्रिया दिलेल्या अवधीत पार पडल्यानंतर आता शनिवार, दि. ११ जुलै २०२६ पासून प्रथम प्रवेश फेरीसाठी ऑप्शन फॉर्म भरणे सुरु होणार असून ती प्रक्रिया सोमवार, दि.१३ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत चालणार आहे. यामध्ये आपल्याला योग्य महाविद्यालय व योग्य अभ्यासक्रम (विभाग) याबाबतचे पसंतीक्रम ऑनलाईन भरावे लागणार आहेत. यासाठी नीट अभ्यास करून कॅप राऊंड- १ चे ऑप्शन फॉर्म भरणे गरजेचे आहे. महाविद्यालय निवडताना महाविद्यालयात दरवर्षी होणारे प्रवेश, विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल, कॅम्पस प्लेसमेंटची संख्या, सोयी-सुविधा, उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग या बाबींचा प्रामुख्याने विचार करावा. विद्यार्थ्यांनी अभ्यास करून करिअरच्या दृष्टीने योग्य महाविद्यालयाची निवड करणे गरजेचे आहे. कॅप राउंडच्या या तीन दिवसात घेतलेला निर्णय अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. सर्व बाजूंनी विचार करून योग्य महाविद्यालयाची निवड करावी. तीन वर्षे मौज मजा करण्यापेक्षा तीन वर्षे परिश्रम करून घेणाऱ्या महाविद्यालयाची निवड करावी, जेणेकरून भविष्यकाळ सुखाचा व समृद्धीचा जाईल. डिप्लोमा प्रथम वर्षासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेल्या विद्यार्थ्यांना या पहिल्या कॅप राऊंडचा लाभ घेता येणार आहे. पहिल्या फेरीसाठी जागावाटप बुधवार, दि.१५ जुलै २०२६ रोजी अधिकृत संकेतस्थळावरून प्रदर्शित केले जाईल. पहिल्या फेरीसाठी वाटप करण्यात आलेल्या जागेची स्वीकृती व प्रवेश निश्चिती गुरूवार दि. १६ जुलै २०२६ ते शनिवार दि. १८ जुलै २०२६ या दरम्यान करता येईल. प्रथम वर्ष डिप्लोमाच्या प्रवेशासंदर्भात अधिक माहितीसाठी प्रा.एस.एस. गायकवाड (मो. ९८९०५६६२८१) व प्रा. जे.बी. रोडगे (मो. ९७६७८५६०२९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. पदविका अभियांत्रिकीच्या ऑनलाईन प्रवेशासाठी मिळालेल्या विक्रमी प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर व कॅम्पस प्लेसमेंटच्या विक्रमी निवडीवर स्वेरीमध्ये अभूतपूर्व गर्दी होण्याची चिन्हे आहेत.




# जननी आशिष चॅरिटेबल ट्रस्ट मधील अनाथ मुलांना जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने चादर, खाऊ, नवीन गोधड्या, ब्लँकेटसची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डोंबिवली/प्रतिनिधी : गुरुनाथ तिरपणकर) सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य करणारी जनजागृती सेवा संस्था ही सर्वश्रुत आहे. गेल्या पाच वर्षात संस्थेने विविध उपक्रम यशस्वीरीत्या राबविले आहेत.असाच एक स्तुत्य उपक्रम डोंबिवली येथे राबविण्यात आला.जननी आशिष चॅरिटेबल ट्रस्ट अनाथ लहान मुलांचे संगोपन करत आहे. मुले म्हणजे देवाघरची फुले, त्यांच्या सोबत घालविलेला प्रत्येक क्षण आपल्याला शिकवितो कि, जीवन कीती सुंदर आहे.आणि साध्या गोष्टींमध्ये खरा आनंद लपला आहे. त्या मुलांना जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने चादर, नवीन गोधड्या, ब्लँकेटसची मदत करण्यात आली.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या सहखजिनदार श्रुती उरणकर, पुनम कदम चंद्रकला मानकर, निता नेवरेकर, कल्पना पेडणेकर यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी ट्रस्टच्या संचालिका वंदना पाटील यांचेही मार्गदर्शन लाभले.

यावेळी ट्रस्ट च्या पर्यवेक्षक शोभा हंडे, श्वेता भोसले, सुवर्णा लिपारे उपस्थित होत्या.संस्थेच्या सहखजिनदार श्रुती उरणकर यांनी इतर महिला सदस्यांना सोबत घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती जयश्री मोकाशी यांच्याशी जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी दुरध्वनी वरुन संपर्क साधून संस्थेची माहिती जाणून घेतली.जननी आशिष ही संस्था गेली३२वर्षे अनाथ मुलांचे संगोपन आणि दत्तक देऊन पुनर्वसन करते.गेल्या ३३ वर्षात ७०० हुन अधिक मुलांचे पुनर्वसन करण्यात संस्था यशस्वी झाली आहे.

**विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांची निवड**

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचा कार्यकर्ता मेळावा आणि पदाधिकारी निवड कार्यक्रम उत्साहात







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने सातारा जिल्हा राष्ट्रवादी भवन येथे कार्यकर्त्यांचा मेळावा तसेच विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीचा संयुक्त कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी पक्ष संघटना अधिक मजबूत करणे, बूथस्तरावर पक्षाची बांधणी, युवक व महिला सहभाग वाढविणे तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. गावागावात पक्षाची भूमिका पोहोचवून जनसंपर्क वाढवावा आणि शेतकरी, युवक, महिला व कष्टकरी घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. शशिकांत शिंदे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना, २०२९ मध्ये सत्ता आपल्याला आणायची आहे. त्यासाठी आजपासूनच प्रत्येक कार्यकर्त्याने जोमाने कामाला लागावे. संघटना मजबूत करा, जनतेमध्ये जा आणि पक्षाची भूमिका प्रभावीपणे पोहोचवा. कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या बळावर २०२९ मध्ये सत्ता आपलीच येणार, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी राज्याचे माजी सहकार मंत्री मा. श्री. बाळासाहेब पाटील, उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष तसेच सातारा जिल्ह्याचे निरीक्षक श्री. नागेश फाटे, श्री. अभयसिंह जगताप, श्री. नितीन शिंदे, श्री. समीर घाटगे, श्री. साहिल बाबा शिंदे, सौ. अर्चनाताई देशमुख, श्री. प्रवीण घायके, श्री. गोरखनाथ नलावडे, शफिकभाई, ड. श्री. निलेश ढेरे, सरचिटणीस श्री. राजकुमार पाटील, सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष श्री. तेजपाल वाघ, उद्योग व व्यापार विभागाचे उपाध्यक्ष श्री. पारिजात दळवी, सौ. सुमित्राताई यादव, सौ. संगीताताई साळुंखे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी नव्या पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आली तसेच ह्या वेळी मोठ्या प्रमाणात नव्या कार्यकर्त्यांचे पक्ष प्रवेश ही ह्या वेळी झाले व पक्षाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. पक्ष संघटना अधिक बळकट करून आगामी काळात जनहिताच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

